क्र.मासं/मावक/न.क्र.३७/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८३ दिनांक १९ / ०१ / २०१२

विषय : मागासवर्गीय कर्मचाऱ्यास सामान्य आदेश क्र.७४ (क)/१११ (क) मधील तरतुदीप्रमाणे उच्च वेतनश्रेणीचा लाभ देताना **"जात वैधता प्रमाणपत्र"** अनिवार्य करण्याबाबत.

-------

प्रशासकीय परिपत्रक क्र.६ दि.१४.१०.२००५ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कंपनीच्या मागासवर्गीय कर्मचाऱ्याने, त्याचे जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केले नसले तरी तो सामान्य आदेश क्र.७४ (क) दि. ३०/०४/७४/ १११ (क) दिनांक १३/०५/८२ मधील इतर अटींची पूर्तता करत असेल तर उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याच्या सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत.

२. तथापि, उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याची प्रकरणे हाताळत असताना असे निदर्शनास आले की, कर्मचाऱ्याने जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केले नसले तरी उच्च वेतनश्रेणीचा लाभ त्यास मिळत असल्याने सदर कर्मचारी जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे प्रयत्न करत नाही. त्यामुळे वैधता प्रमाणपत्र प्राप्त नसतानां, अशा कर्मचाऱ्यांना लाभ मिळण्यास अटकाव होत नाही.

३. या अनुषंगाने मागासर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी शासनाच्या धोरणांची पडताळणी केली असता, असे दिसून आले आहे की, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी शासनाने **"सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना"** लागू केली आहे. या अनुषंगाने शासनाने स्पष्टीकरणात्मक आदेश जारी केले आहेत व त्यामध्ये खुलासा केल्याप्रमाणे **'सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा' लाभ देण्यासाठी मागासवर्गीय उमेदवारांकडे जातीचे वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.** कारण या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना अनुज्ञेय होत असल्याने सर्वसाधारण पदोन्नतीच्या आवश्यकता अशा कर्मचाऱ्याने पूर्ण करणे अपेक्षित आहे. शासनाच्या सदर धोरणाच्या आधारावर व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन), संचालक (वित्त) व कार्यकारी संचलक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

४. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याच्या तरतुदी अन्वये एखाद्या संवर्गामध्ये पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध नसेल, तेंव्हा तसेच एखाद्या संवर्गामध्ये पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध आहे, मात्र रिक्त पदांच्या अभावी कर्मचाऱ्यास पदोन्नती मिळाली नसेल, तर कुंठीतता (Stagnation) दूर करण्यासाठी उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येतो. मात्र कर्मचाऱ्याने त्यावेळी पदोन्नतीसाठी आवश्यकता असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करणे आवश्यक असते. पदोन्नतीसाठी पात्र होण्यासाठी कर्मचाऱ्याकडे जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे व ही एक अट असल्यामुळे ज्या पदांना पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध आहे अशा पदांमधील मागासवर्गीय कर्मचाऱ्यास उच्च वेतनश्रेणीचा लाभ देताना त्या **"कर्मचाऱ्याकडे जात वैधता प्रमाणपत्र"** असणे आता बंधनकारक ठरते.

५. सबब, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा लाभ देताना उपरोक्त बाबीप्रमाणे कार्यवाही करावी. परिणामी, यापुर्वीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.६ दि.१४.१०.२००५ अधिक्रमीत करण्यात येत आहे. सदर परिपत्रक त्वरित अंमलात येईल. तसेच या परिपत्रकाच्या अनुषंगाने यापुर्वी निकालात काढलेली प्रकरणे पुन:श्च विचारात घेण्यात येवू नये.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या **इंन्ट्रानेटवर** उपलबध आहे.

*(विजय भि. बागुल)* १९/१/२०
*मुख्य महाव्यवस्थापक (मास.)*